**<u>ठळक बातम्या</u>**

- पुराचं पाणी दुष्काळग्रस्त भागात वळवण्याच्या राज्याच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाला अर्थसहाय्य करण्याचं मुख्यमंत्र्यांचं जागतिक बँकेला आवाहन

- अमृत महा आवास अभियान २०२२-२३ चं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- राज्यपालांनी सगळ्या मर्यादा सोडल्या असल्याची शरद पवार यांची टीका/ राज्यपालांच्या विरोधात तमाम महाराष्ट्रप्रेमींनी एकत्र येण्याचं उद्धव ठाकरे यांचं आवाहन, तर राज्यपालांना पदावरुन हटवण्याची भाजपा खासदार उदयनराजे भोसले यांचीहीी मागणी  दाखल

- मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकांत ७६२ अंकांची वाढ नोंदवत ६२ हजार २७२ अंकांवर बंद

**आणि**

- ५५ व्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत  महाराष्ट्राचा पुरुष आणि  महिला संघ अंतिम फेरीत दाखल

**<><><><><>**

मराठवाडा आणि विदर्भ भागातल्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कृषी प्रकल्पांसोबतच दुष्काळग्रस्त भागात पुराचं पाणी वळवण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प राज्य शासनानं तयार केला असून त्यासाठी जागतिक बँकेने अर्थसहाय्य करावं, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केलं.

जागतिक बँकेचे भारतातले प्रमुख ऑगस्टे तानो कौमे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीत महाराष्ट्र कौशल्य विकास प्रकल्प, हवामान बदलाचा कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम, बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन स्मार्ट प्रकल्प, बेस्टसाठी इलेक्ट्रीक बसेस याबाबत सविस्तर चर्चा झाली.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामुळे मराठवाडा आणि विदर्भातल्या सुमारे ५००० गावांना फायदा होत आहे. या प्रकल्पाला जागतिक बँकेचं सहाय्य लाभलं असून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याच्या यशस्वीतेनंतर दुसऱ्या टप्प्याला मान्यता देण्याचं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

२०२४ पर्यंत प्रत्येकाला घर हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं स्वप्न साकार करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवण्याची गरज असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आज मुंबईत अमृत महा आवास अभियान २०२२-२३चं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. राज्यातल्या सर्व समाजघटकांच्या हितरक्षणासाठी शासन कटिबद्ध आहे असं ते म्हणाले.  उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितलं की या मोहिमेची अंमलबजावणी प्रभावीरीत्या करण्यात येईल आणि लौकरच महाराष्ट्र बेघरमुक्त राज्य म्हणून ओळखलं जाईल. या अभियानाच्या सर्वेक्षणात नोंद करायची राहून गेलेल्यांनाही घर मिळेल असं ते म्हणाले.

या अभियानातून ५ लाख गरीब, गरजू आणि भूमीहीनांचं घरकुलाचं स्वप्न साकार होईल असं ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी यावेळी सांगितलं. ही मोहीम ३१ मार्च २०२३ पर्यंत चालणार आहे. या कार्यक्रमात महाआवास पुरस्कारांचं वाटपही करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्यपाल ही एक संस्था असून तिच्या काही मर्यादा आणि बंधन असतात. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख करताना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी सगळ्या मर्यादा सोडल्या अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे. त्या प्रकरणानंतर राज्यपालांनी छत्रपतींच कौतुक करणारं विधान केलं. मात्र, राज्यभरातून उमटलेल्या प्रतिक्रियांनंतर केलेलं हे विधान म्हणजे उशीराचं शहाणपण आहे, असं ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत म्हणाले. विविध विषयांवर त्यांनी यावेळी भाष्य केलं. तसंच राज्यपालांच्या या विधानाची दखल आता राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी घ्यावी. अशा व्यक्तीकडे राज्यपाल पदासारख्या जबाबदाऱ्या देणं योग्य नाही, असंही पवार म्हणाले.

**<><><><><>**

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी वारंवार महाराष्ट्राचा, महाराष्ट्राच्या दैवतांचा अपमान करत आहेत, अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली असून, पक्षीय राजकारण बाजूला ठेवून तमाम महाराष्ट्रप्रेमींनी याविरोधात एकत्र यावं, असं आवाहनही त्यांनी केलं आहे. ते आज मातोश्री निवासस्थानी आयोजित वार्ताहर परिषदेत बोलत होते. केंद्र सरकारनं राज्यपालांना त्वरित माघारी बोलावून घेतलं नाही तर महाराष्ट्र प्रेमी आंदोलन करतील, असा इशारा त्यांनी यावेळी दिला. केंद्रात सत्ता असणाऱ्या पक्षाच्या विचारसरणीची व्यक्ती राज्यपाल म्हणून नेमली जाते, याबद्दल रोष व्यक्त करत, राज्यपाल नेमणुकीचे निकष ठरवण्याची गरज निर्माण झाल्याचं ते म्हणाले.

राज्य मंत्रिमंडळाची बैठक काल झाली नाही कारण मंत्री गुजरातमध्ये प्रचाराला गेले होते. त्यांनी राज्य वाऱ्यावर सोडलं आहे, या सरकारमुळेही महाराष्ट्राची अवहेलना होत आहे, अशी टीका ठाकरे यांनी केली.

कर्नाटकचे मुख्यमंत्री महाराष्ट्राच्या प्रदेशावर हक्क सांगताहेत, यामागे कुणाचा हात आहे, हे तपासलं पाहिजे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना पदावरुन हटवण्याची मागणी, भाजपा खासदार उदयनराजे भोसले यांनी केली आहे. ते आज साताऱ्यात बातमीदारांशी बोलत होते. राज्यपाल कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यावर आश्चर्य वाटत असल्याचं ते यावेळी म्हणाले. आदर्श भारताची संकल्पना मांडणाऱ्या शिवाजी महाराजांचे विचार जुने कसे, असा प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना यासंदर्भात पत्रं लिहिलं असल्याचं  त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात असताना कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी त्याबाबत बेजबाबदार, प्रक्षोभक वक्तव्यं करणं निषेधार्ह असून हे महाराष्ट्र सहन करणार नाही, अशी तीव्र प्रतिक्रिया विधानसभेतले विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दिली आहे. जत आणि अक्कलकोट तालुक्यातल्या गावांवरचा दावा त्यांच्यासाठी 'खयाली पुलाव' ठरेल. बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकीसह सीमाभागातली ८१४ मराठीभाषक गावं महाराष्ट्रात येणं हा खरा मुद्दा आहे. ही गावं महाराष्ट्रात आल्यानंतरच संयुक्त महाराष्ट्राचं स्वप्न पूर्ण होणार आहे. या स्वप्नपूर्तीसाठी संपूर्ण महाराष्ट्र एकजुटीनं लढेल, असं पवार यांनी म्हटलं आहे.

कर्नाटकचे मुख्यमंत्री भाजपाचे असून त्यांनी अशी वक्तव्यं तात्काळ थांबवावीत, केंद्र सरकारनं याप्रकरणात लक्ष घालून त्यांना आवरावं, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

**<><><><><>**

मुंबईत चर्नीरोड इथं मराठी भाषा भवन, आणि नवी मुंबईत ऐरोली इथं उपकेंद्र, अशा दोन्ही प्रस्तावित इमरतींच्या उभारणीचं काम येत्या दोन-तीन आठवड्यात सुरू होण्याची शक्यता आहे. उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज ऐरोली इथल्या प्रस्तावित मराठी भाषा भवन उपकेंद्राच्या जागेची पाहणी केल्यानंतर बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली.

**होल्ड-बाईट-उदय सामंत**

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकांत आज ७६२ अंकांची वाढ झाली आणि तो ६२ हजार २७२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजारचा निफ्टीही २१७ अंकांची वाढ नोंदवत १८ हजार ४८४ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

५५ व्या राष्ट्रीय खो खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला, अशा दोन्ही संघानी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

उपांत्य फेरीच्या पुरुष गटाच्या सामन्यात महाराष्ट्रानं कोल्हापूरला १९-१५ असं नमवलं. तर, महिला गटानं महाराष्ट्रानं दिल्लीला १९-१० असं पराभूत केलं.

अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या पुरुषांची भारतीय रेल्वे विरुध्द, तर महिलांची विमान प्राधिकरणाविरुध्द लढत होईल.

**<><><><><>**

कोल्हापूर जिल्ह्याच्या क्रीडा विकासासाठी 'विशेष पॅकेज' देण्यासाठी प्रयत्न करु असं आश्वासन पालकमंत्री दीपक केसरकर यांनी आज दिलं. कोल्हापूर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाच्या दृष्टीनं आज पालकमंत्र्यांनी शहरात विविध ठिकाणांना भेटी देऊन पाहणी केली. पंचगंगा घाट, शाहू तालीम, मोतीबाग तालीम, शाहू मिल, अंबाबाई मंदिर या परिसराचा त्यात समावेश होता.

कोल्हापूरला खेळाचा वारसा आहे. ऑलिम्पिक स्पर्धेत खाशाबा जाधवांनी कुस्तीमध्ये पहिलं पदक आपल्या देशाला मिळवून दिलं. भविष्यात देशाला ऑलिंपिकमध्ये अधिकाधिक सुवर्णपदके मिळवून देण्यासाठी खेळाडू कोल्हापूरच्या मातीत घडण्यासाठी आवश्यक त्या सर्व सेवा सुविधा देण्यात येतील, असं केसरकर यांनी सांगितलं.

<><><><><>

राज्यात कोविड १९च्या रुग्णसंख्येत लक्षणीय घट झाली असून उपचाराधीन रुग्णांची संख्या ६०० च्या खाली आली आहे. आज राज्यात ५२ नव्या रुग्णांची नोंद झाली, तर १०९ रुग्ण बरे होऊन घरी गेले. आज कोरोनामुळे एकाही रुग्णाच्या मृत्यूची नोंद झालेली नाही. राज्यात आतापर्यंत ८१ लाख ३५ हजार ४५० जणांना कोरोनाची लागण झाली. त्यापैकी आतापर्यंत ७९ लाख ८६ हजार ४८९ रुग्ण कोरोनामुक्त झाले तर १ लाख ४८ हजार ४०४ रुग्ण दगावले. सध्या राज्यात ५५७ रुग्णांवर उपचार सुरू आहे. त्यापैकी सर्वाधिक २२५ रुग्ण पुण्यात तर ८७ रुग्ण ठाण्यात आहेत. मुंबईत ८२ रूग्ण आहेत. राज्यात रुग्ण बरे होण्याचा दर ९८ पूर्णांक १७ शतांश टक्के तर मृत्यू दर १ पूर्णांक ८२ शतांश टक्के आहे.

<><><><><>

महसूल गुप्तवार्ता संचालनालयाच्या मुंबई विभागानं आज छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुमारे २० कोटी रुपये किमतीचं कोकेन जप्त केलं. लागोस इथून मुंबईत आलेल्या या संशयितानं मद्याच्या दोन बाटल्यांमध्ये हा अमली पदार्थ दडवला होता. आंतरराष्ट्रीय तस्करीच्या या कटाबद्दल अधिक तपास सुरू आहे.

<><><><><>

भारतीय लेखापरीक्षण आणि लेखा विभागानं आयोजित केलेल्या लेखापरीक्षण सप्ताहाचा आज मुंबईत समारोप झाला. लेखापरीक्षण प्रक्रियेविषयी जनजागरूकता

निर्माण करण्यासाठी तसंच प्रशासनातलं लेखापरीक्षणाचं महत्त्व अधोरेखित करण्यासाठी ही परिषद आयोजित करण्यात आली होती. आर्थिक गैरव्यवहार टाळण्याच्या दृष्टीनं सेबीकडून त्रयस्थ पक्षी प्रमाणीकरणावर भर दिला जात आहे, असं सेबी अध्यक्ष माधवी पुरी बूच यांनी यावेळी सांगितलं. एखाद्या दस्तावेजात माहिती वगळली जाणार नाही किंवा वेगळ्या पद्धतीनं मांडली जाणार नाही, हे लेखापाल सुनिश्चित करू शकतात, असं सांगत सदसद्विवेकबुद्धी शाबूत ठेवून काम करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**<><><><>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या १ हजार ५०० कोटी रुपयांच्या पाणी पुरवठा योजनांचं ऑनलाईन उद्घाटन आज पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी केलं. गावा गावात लोकांना पाणी पुरवण्याच्या या कामात कुणीही राजकारण करू नये, असं गुलाबराव पाटील यावेळी म्हणाले. जिल्ह्यात चांगल काम करणाऱ्या सरपंचांना जलदूत पुरस्कार देण्याची घोषणा त्यांनी केली. या कार्यक्रमाला खासदार हिना गावित, आमदार आमश्या पाडवी, जिल्हा परिषद अध्यक्ष सुप्रिया गावित यांच्या सह जिल्हा परिषद सदस्य उपस्थित होते.

**<><><><>**

दिव्यांग सक्षमीकरणात महाराष्ट्रानं तब्बल सात पुरस्कार पटकावले आहेत. सुगम्य भारत अभियानाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र हे सर्वश्रेष्ठ राज्य ठरलं असून, हा पुरस्कार दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांना जाहीर झाला आहे. केंद्र सरकारच्या दिव्यांग जन सक्षमीकरण विभागाद्वारे हे पुरस्कार दिले जातात.

**<><><><>**

पी १५ बी या श्रेणीतली मोरमुगाव ही दुसरी विनाशिका आज माझगाव डॉक शिपबिल्डर्सनं भारतीय नौदलाकडे सुपूर्द केली. भारतात बांधलेली ही सर्वात मोठी विनाशिका आहे. तिची लांबी १६४ मीटर असून वजन साडे सातहजार टनांहून

अधिक आहे. अत्याधुनिक ब्राह्मोस आणि बराक क्षेपणास्त्र यावर बसवण्यात आली आहेत.

**<><><><>**

मनी लाँडरिंग प्रकरणी माजी मंत्री नवाब मलिक यांच्या जामीन अर्जावर येत्या ३0 नोव्हेंबरला न्यायालयाचा निर्णय येण्याची शक्यता आहे. विशेष न्यायाधीश आर. एन. रोकडे यांनी दोन्ही बाजूंचं म्हणणं ऐकून घेतल्यावर गेल्या १४ नोव्हेंबरला आजची तारीख दिली होती. मात्र आज आदेश तयार नसल्यानं न्यायालयानं पुढची तारीख ३0 नोव्हेंबर दिली.

**<><><><>**

पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेतर्फे कला, चित्रपट आणि सौंदर्यशास्त्राशी संबंधित उपकरणांचं एक प्रदर्शन भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाअंतर्गत पणजीच्या फूटबॉल मैदानावर भरवण्यात आलं आहे. समकालीन चित्रपट निर्मितीत वापरले जाणारे अत्याधुनिक कॅमेरे, भिंग, विविध प्रकारचे दिवे, चिमटे अशी अनेक उपकरणं प्रदर्शनात मांडण्यात आली आहेत. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी आज या प्रदर्शनाला भेट दिली.

**<><><><>**

गेल्या २४ तासात कोकणात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली. विदर्भात बऱ्याच ठिकाणी, तर कोकणात काही ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली. येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. अन्यत्र हवामान कोरडं राहील.

**//<><><><><>//**